आधुनिक विचारांचे
# वर्तमान

जनसामान्यांचे हृदयस्थान
अजितदादा पवार
वाचा : दादापर्व



बीड । गुरुवार, २२ जुलै २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ३९ । पाने : ४ । मूल्य २ ₹

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# आजपासून विकासाचे नवे पर्व

## विकासकामांचा मंत्री धनंजय मुंडेंच्या हस्ते आज परळीत शुभारंभ

प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री नामदार अजित पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघात विकासपर्व सुरू असून, तीर्थक्षेत्र विकास योजनेतून वैद्यनाथ मंदिर परिसरातील यात्री (भक्त) निवासच्या भव्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन मंत्री मुंडेंच्या हस्ते आज गुरुवार दि.२२ रोजी करण्यात येत आहे. त्याच बरोबर व्ही.आय.पी. सर्किट हाऊस परिसरात उभारण्यात येणाऱ्या नवीन ३३ केव्ही सबस्टेशनच्या उभारणी कामाचे व परळी शहरातील दोन महत्त्वाच्या सिमेंट रस्त्याच्या कामांचे देखील यावेळी मंत्री मुंडेंच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषणा केल्याप्रमाणे परळीतील वैद्यनाथ मंदिर परिसरात जुन्या तहसिलच्या जागी भव्य यात्री निवास उभारण्यात येणार आहे. सायंकाळी ५.४५ वाजता होणाऱ्या या भूमिपूजन समारंभास मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह आमदार संजय दौंड, नगराध्यक्षा सौ. सरोजिनीताई हालगे, वैद्यनाथ मंदिर समितीचे सचिव राजेश देशमुख यांच्यासह सर्व विश्वस्त, पदाधिकारी तसेच नगर परिषदेचे सर्व सभापती, पदाधिकारी, नगरसेवक व अधिकारी उपस्थित राहणार आहेत.



त्याचबरोबर सर्किट हाऊस परिसरात ३३ केव्ही सबस्टेशन उभारल्यामुळे मुख्य विद्युत वाहिनीवरील ताण कमी होऊन विजेचा लपंडाव बंद होण्यास मोठी मदत मिळणार आहे. या कामाचे सर्किट हाऊस परिसरात आज सायंकाळी ५.१५ वाजता भूमिपूजन करण्यात येणार असून, या समारंभास मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार, सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी तसेच महावितरणचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत. परळी शहरातील संत भगवानबाबा चौक ते तहसिल कार्यालय व दोस्ती टी हाऊस ते अग्रवाल आईस फॅक्टरी या दोन महत्वाच्या रस्त्याच्या कामांचेही ना. मुंडेंच्या हस्ते आज सायंकाळी ५.१५ वाजता भूमिपूजन होणार आहे. या कार्यक्रमास मंत्री धनंजय मुंडे, आमदार संजय दौड, यांच्यासह नगराध्यक्षा सौ.सरोजिनीताई हालगे, न.प. गटनेते वाल्मिक कराड , सर्व सभापती, पदाधिकारी आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी कोरोना नियमांचे पालन करत उपस्थित रहावे, असे आवाहन नगरपालिकेच्या वतीने तसेच महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

### आरोग्य सेवा सप्ताहाचा होणार समारोप

परळी : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त परळी येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध सामाजिक उपक्रम व अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

परळीतील मोंढा मैदान येथे आज सायंकाळी ६.०० वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार असून, या कार्यक्रमात १०००० गरजू महिलांना मोफत साडी वाटप करण्यात येणार आहे. पंतप्रधान आवास योजनेतील नगर पालिकेंतर्गत मंजुरी मिळालेल्या १२१ घरकुलांच्या पहिल्या हप्त्याचे त्याचबरोबर नगर परिषदेच्या वतीने मंजूर करण्यात आलेल्या १०० घरकुलांच्या चेकचेही वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात पंचायत समिती अंतर्गत ८५० विहिरींच्या मंजुरीचे पत्र, रमाई घरकूल योजनेंतर्गत मंजूर घरकुलांचे ३५० चेकचे वाटप तसेच पशुधन कर्जाच्या चेकचेही वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमानंतर नामदार अजित पवार यांच्या अभिष्टचिंतानाचा कार्यक्रम संपन्न होणार असून, यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह आमदार संजय दौंड, जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.शिवकन्याताई सिरसाट, नगराध्यक्षा सौ.सरोजिनीताई हालगे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आरोग्य सेवा सप्ताहाचा समारोप मंत्री धनंजय मुंडे यांच्या १५ जुलै या जन्मदिनापासून ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जन्मदिनापर्यंत (२२ जुलै) या सात दिवसात परळीत राबविण्यात आलेल्या आरोग्य सेवा सप्ताह या उपक्रमाचा समारोप देखिल या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. या उपक्रमात मागील ५ दिवस महारक्तदान शिबीर, नेत्र तपासणी, सर्व रोग निदान शिबीर, भव्य लसीकरण मोहीम यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. कोरोना विषयक नियमांचे पालन करून या कार्यक्रमाना उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी वैजनाथ नगर परिषद, पंचायत समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### 'त्या' कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत द्यावी : पटेल



माजलगाव : तालुक्यातील सुर्डीनजीक येथील अत्याचारग्रस्त पिडीत चिमुकलीला व कुटुंबीयांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी आणि अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधम आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी नगरसेवक तौफीक पटेल यांनी केली आहे. सुर्डी नजीक येथील एका नऊ वर्षाच्या चिमुकलीवर नराधम आरोपी पुरुषोत्तम घाटूळने अत्याचार करून गंभीर जखमी केले आहे. या नीच नराधमांना वेळीच ठेचले पाहिजे. तसेच पीडित मुलीला शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी नगरसेवक तौफीक पटेल यांनी दिलेल्या प्रसिद्दी पत्रकातून शासनाकडे केली आहे.

### बकरी ईद उत्साहात; साध्या पद्धतीने साजरी

बीड : गेल्या वर्षीपासून कोरोनाचा संसर्ग सुरू आहे. या कार्यकाळात सार्वजनिक आणि धार्मिक कार्यक्रम अगदी साध्या पद्धतीने साजरे केले जात आहेत. शासनाने ज्या काही नियमावली घालून दिल्या आहेत त्या नियमानुसार सण उत्सव साजरे होत आहेत. बुधवारी बकरी ईद असल्याने यंदाची ईदही अगदी साध्या पद्धतीने साजरी करण्यात आली आहे. मुस्लिम बांधवांनी घरीच ईदची नमाज अदा केली. देशभरामध्ये कोरोनाचा संसर्ग दोन वर्षापासून सुरू झालेला आहे. बुधवारी बकरी ईदच्या निमित्ताने शासनाने नियमावली ठरवून दिल्यानुसार मुस्लिम समाजाने साध्या पद्धतीने बकरी ईद साजरी केली. घरीच नमाज अदा करून नियमांचे पालन करण्यात आले आहे.

### ऊर्ध्व कुंडलिका प्रकल्पात ९० टक्के पाणीसाठा

वडवणी : ऊर्ध्व कुंडलिका धरणाची पाणी पातळी ५३६.१० मीटर झाली असून धरणातील उपयुक्त साठा ८४ टक्के इतका झालेला आहे. धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग हा धरणाच्या ऊर्ध्व भागातील पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या तीव्रतेनुसार धरणात यणाऱ्या पाण्याच्या येव्याच्या अनुषंगाने ठरविण्यात येणार आहे. कुंडलिका नदीकाठावरील शेतकरी, नदीकाठावर वस्ती करून राहिलेले नागरिक यांना सावधतेचा इशारा दिला असून जेणेकरून जीवित अथवा वित्त हानी होणार नाही याची खबरदारी प्रशासनाकडून घेतली जात आहे.वडवणी तालुक्यात असलेल्या, वरदान ठरलेल्या ऊर्ध्व कुंडलिका धरणात गेल्या आठ दिवसांपासून पडणाऱ्या सततच्या पावसामुळे पाणी पातळीत वेगाने वाढ होत आहे. पावसाचा जोर वाढत असल्यामुळे हे धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरले.



वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !



संपादकीय

## आयटी क्षेत्रात अंबानींचे पदार्पण

भारतातील अंबानी ग्रुपचे काम सर्वव्यापी आहे. अशा या ग्रुपने आता आयटी क्षेत्रातही पदार्पण केले आहे. सौदी अरेबियाची अरामको, गुगल, फेसबुकसारख्या मोठ्या कंपन्यांमध्ये भागीदारी, सौर वीजनिर्मिती क्षेत्रात पदार्पण, मोठमोठ्या कंपन्यांवर ताबा अशा घोडदौडीमुळे रिलायन्स उद्योग समूहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी चर्चेत आहेत. या पार्श्वभूमीवर जस्ट डायल'सारखी छोटी कंपनी ताब्यात घेण्यात अंबानी यांना रस का वाटला, याबद्दल कुतूहल वाटणं स्वाभाविक आहे; परंतु माहितीचा स्रोत आणि माहितीच्या जोरावरच सध्या जगावर राज्य करता येते, याची जाणीव असलेल्या मुकेश अंबानी यांनी भरपूर डाटा असलेली कंपनी स्वतःच्या पंखाखाली आणण्याचा विचार केला असावा. मुकेश अंबानी किरकोळ व्यवसायात आपली पकड आणखी मजबूत करण्यासाठी नवीन योजना आखण्यात गुंतले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार रिलायन्स लवकरच जस्ट डायल खरेदी करू शकेल. त्यासाठी बोलणी सुरू आहेत. हा करार ८० ते ९० कोटी डॉलरला होईल, अशी अपेक्षा आहे. रिलायन्स उद्योगसमूह देशातला सर्वात मोठा संघटित किरकोळ विक्रेता बनला आहे. तर, जस्ट डायल' स्थानिक शोध इंजिन विभागातल्या बाजारात प्रभावी आहे. एप्रिलपासून रिलायन्स आणि जस्ट डायल'दरम्यान चर्चा सुरू होती. या करारासाठी सल्लागार म्हणून शार्दुल अमरचंद मंगलदास अँड कं., सिरिल अमरचंद मंगलदास आणि गोल्डमन सॅक्स यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यकारी संचालक व्हीएसएस मणी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे या कंपनीत ३५.५ टक्के भागभांडवल असून त्याचे सध्याचं मूल्य २३८७.९ कोटी रुपये आहे..मणी यांच्याकडून अर्धा हिस्सा खरेदी करण्याचा विचार रिलायन्स करत आहे. ओपन ऑफरची संपूर्ण सदस्यता घेतली, तर या कंपनीमध्ये रिलायन्सचा हिस्सा ६० टक्क्यांहून अधिक असेल. जस्ट डायल ही पॅन-इंडिया नेटवर्कसह २५ वर्षांची माहिती शोध आणि सूचीबद्ध कंपनी आहे. हा करार पूर्णत्वास गेल्यानंतर रिलायन्स रिटेलला जस्ट डायलच्या व्यापारी डेटाबेसचा लाभ मिळेल. १९९६मध्ये फोन आधारित सेवा म्हणून जस्ट डायलची सुरुवात झाली. त्यावेळी ही संस्था मार्केट लीडर होती; परंतु नंतर प्रॅक्टो, अर्बन कंपनी, बुकमायशो, झोमाटो, पेटीएम आणि मेक माय ट्रिप या कंपन्यांच्या आगमनाने त्याची क्रेझ कमी झाली. टाटा सन्सने काही काळापूर्वी जस्ट डायलबरोबर हात मिळवण्याचा प्रयत्न केला होता. दोघांमध्ये चर्चाही झाली; पण पुढे काहीच झालं नाही. अशा परिस्थितीत मुकेश अंबानी या संधीचं सोनं करायला सरसावले. फ्युचर ग्रुपच्या मालमत्तांची खरेदी आणि ॲमेझॉन बरोबरच्या भागीदारीनंतर मुकेश अंबानी हे पाऊल उचलत आहेत. रिलायन्सने अलीकडेच आपली ग्राहक सेवा वाढवण्याची घोषणा केली. रिलायन्स सध्या देशातली सर्वात मोठी संघटित किरकोळ विक्रेता आहे, तर जस्ट डायल स्थानिक शोध इंजिन विभागात बाजारात अग्रणी आहे. मोबाईल, ॲप्स, वेबसाइट आणि हॉटलाइनमार्फत सुमारे १५० दशलक्ष नवीन वापरकर्ते जस्ट डायलकडून माहिती घेतात. मणी यांच्याकडून ही कंपनी खरेदी करण्याचा रिलायन्स विचार करत आहे. याशिवाय कंपनी जस्ट डायलच्या इक्विटीमध्ये २६ टक्के समभाग खरेदी करण्याचा विचार करत आहे. सध्याच्या शेअर किमतींचा अंदाज घेता रिलायन्सला या खरेदीसाठी ४,१०२ कोटी रुपये खर्च करावे लागतील. हे दोन्ही सौदे झाले, तर रिलायन्सचा जस्ट डायलमध्ये सुमारे ६० टक्के हिस्सा असेल आणि कनिष्ठ भागीदार म्हणून व्हीएसएस मणी कंपनी चालवतील. हा करार झाल्यानंतर मुकेश अंबानी त्यात भांडवल देखील गुंतवण्याचा निर्णय घेऊ शकतात. बॉलिवूडमधील बिग बी अमिताभ बच्चन यांनीदेखील जस्ट डायलमध्ये गुंतवणूक केली आहे. डिसेंबर २०१०मध्ये जस्ट डायलने महानायक अमिताभ बच्चन यांना आपला ब्रँड ॲम्बेसेडर बनवलं होते. २०११ मध्ये त्यांना कंपनीने ६२ हजार ७९४ शेअर्स दिले. २०१५ पर्यत या समभागांच्या किमतीत वाढ झाल्याने अमिताभ बच्चन यांची कंपनीतली गुंतवणूक २६ कोटी रूपये झाली. म्हणजेच, त्यांना खूप मोठा फायदा झाला. आता अंबानी ग्रुप आयटी क्षेत्राकडे वाळला आहे. त्यामुळे उद्योग जगताला नवी आशा निर्माण झाली आहे.

# महागाईच्या तुलनेत पेन्शन कमी

**कर्मचाऱ्यांची ५८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर ते पेन्शनसाठी पात्र ठरतात. ही पेन्शन मिळण्यासाठीही अट घातली आहे. ती म्हणजे ईपीएसच्या खात्यात किमान दहा वर्षांचे योगदान असायला हवे. कर्मचाऱ्यांचे योगदान आणि नोकरीचा कालावधी या आधारावर पेन्शनचे आकलन केले जाते. ईपीएफओच्या सध्याच्या नियमांनुसार पीएफमधे कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन म्हणजेच बेसिक आणि डीएच्या १२ टक्के रक्कम जमा केली जाते.**




अर्थविश्व
**महेश यादव**

ईपीएफओच्या सध्याच्या नियमांनुसार पीएफमधे कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन म्हणजेच बेसिक आणि डीएच्या १२ टक्के रक्कम जमा केली जाते. काही कंपन्या संपूर्ण पगारात कपात लागू करतात. त्यातून न कपात होणारी १२ टक्के रक्कम ही पीएफ खात्यात जमा होते, तर कंपन्यांकडून दिले जाणारे योगदान हे ईपीएफमधे जमा न होता विविध घटकात विभागले जाते..यात ३ ६७ टक्के पीएफमधे, ८.३३ टक्के पेन्शन खात्यात जमा होतं. या योजनेत सगळ्या कर्मचाऱ्यांच्या खात्यात केंद्र सरकार १.१६ टक्के योगदान देतं. ईपीएफच्या मूळ वेतनाची कमाल मर्यादा सध्या १५ हजार रुपये दरमहा आहे. अशा वेळी ईपीएसमधे दर महिन्याला १२५० रुपये कमाल जमा होऊ शकतात. कर्मचाऱ्यांची ५८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर ते पेन्शनसाठी पात्र ठरतात. ही पेन्शन मिळण्यासाठीही अट घातली आहे. ती म्हणजे ईपीएसच्या खात्यात किमान दहा वर्षांचे योगदान असायला हवे. कर्मचाऱ्यांचे योगदान आणि नोकरीचा कालावधी या आधारावर पेन्शनचं आकलन केले जाते.

पेन्शन कशी ठरते?

कर्मचारी पेन्शन योजना १५ नोव्हेंबर १९९५ ला सुरू झाली. यानुसार सध्या किमान पेन्शनची रक्कम १००० रुपये, तर कमाल ७५०० रुपये आहे. महागाईच्या काळात ही रक्कम खूपच कमी आहे. यानुसार कर्मचारी संघटना किमान पेन्शनची रक्कम वाढवून ती ५ हजार रुपये करण्याची मागणी करत आहेत. यासंदर्भात सरकारवर आपल्याच सहयोगी संस्थांचा दबाव वाढलाय. कोरोना वायरस आला नसता तर याबद्दल निर्णय झाला असता. पण आता ही रक्कम कधी वाढेल, हे सांगता येत नाही. पेन्शनची रक्कम कशी निश्चित होते, याबद्दल अनेक जण द्विधा मन:स्थितीत आहेत. यासाठी ईपीएफचा एक फॉर्म्युला ठरलेला आहे. या आधारावर आपण पेन्शनची रक्कम समजू शकता. जर एखादा व्यक्ती ईपीएसमधे दहा वर्षांपर्यंत योगदान देत असू, तर तो पेन्शनसाठी पात्र ठरेल. मात्र ही सुविधा वयाच्या ५८ व्या वर्षानंतर मिळेल. अर्थात काही अटी आणि नियमांसह वयाची पन्नाशी ओलांडल्यानंतरही पेन्शन मिळू शकते.

असा आहे फॉर्म्युला

जर एखादा कर्मचारी २० वर्षांची सेवा पूर्ण करत असेल, तर त्यात दोन वर्ष बोनस म्हणून गृहीत धरली जातात. वयाचं आकलन हे राऊंड फिगरमधे केलं जातं. पेन्शन योग्य सेवा १० वर्ष ६ महिने असेल, तर त्याला ११ वर्ष असं गृहीत धरलं जातं. बारा वर्ष व्हायला सहा महिन्यांचा काळ राहिला असला तरी सहा महिने सोडून दिले जातात. पेन्शन = बेसिक+डीए गुणिले नोकरीची वर्ष/७० उदाहरणार्थ, अमितचं गेल्या वर्षी सरासरी वेतन हे बेसिक आणि डीए मिळून १५ हजार रुपये होतं आणि पेन्शनपात्र नोकरीचा कालावधी २१ वर्ष होता. यानुसार १५ हजार गुणिले २१ भागिले ७० म्हणजे त्याला दरमहा साडेचार हजार रुपये पेन्शन मिळेल.

५८ वर्षानंतरच कायमची पेन्शन

आपल्याला प्रॉविडंड फंडमधून पैसे काढायचे असतील, तर आपल्या खात्यात जमा असलेली रक्कम कधीही काढू शकता. मग नोकरीचा कालावधी हा एक वर्षाचा असो किंवा दहा वर्षांचा असो. जर नोकरी बदलल्यानंतर आपण पीएफचे एका खात्यातून दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर करत असाल, तर पेन्शनची रक्कम काढू शकत नाही. पेन्शनची रक्कम ही सर्विस हिस्ट्रीला जोडली जाते. जर आपण वेगवेगळ्या संस्थेत काम करत असताना सलग दहा वर्षे सेवा झाली, तर आपण पेन्शनला पात्र म्हणून गृहीत धरले जातो. या स्थितीत वयाच्या ५८ व्या वर्षानंतर मासिक पेन्शन मिळत राहील. नोकरी सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीची असेल, तर आपण केवळ पीएफच काढू शकता. यानुसार आपल्याला निवृत्तीवेतन मिळणार नाही. आपली नोकरी दहा वर्षांची असेल तरीही पीएफबरोबर पेन्शनची रक्कम काढू शकणार नाही. या स्थितीत आपल्याला नियमानुसार ५८ वर्षानंतरच कायमची पेन्शन मिळत राहील. जर नोकरी सहा महिन्यांपेक्षा अधिक आणि साडेनऊ वर्षांपेक्षा कमी असेल, तर आपण ईपीएफमधे फॉर्म १९ आणि १० सीच्या माध्यमातून पीएफबरोबरच पेन्शनची रक्कमही काढू शकता. ही प्रक्रिया आपल्याला ईपीएफओ कार्यालयात जाऊन पूर्ण करावी लागेल. कर्मचाऱ्यांसाठी कर्मचारी पेन्शन योजना सुरू करण्यात आली. अर्थात महागाईच्या तुलनेत पेन्शनची रक्कम खूपच कमी आहे. पण कमी उत्पन्नधारकांसाठी ही स्किम उपयुक्त असून ती वृद्धापकाळात आर्थिक आधार ठरू शकते.

(साभार अर्थभान पुरवणीतून)

# काय आहे? नाणी, नोटांचा इतिहास



**पूर्वी वस्तुविनिमय पद्धत होती, पैसा म्हणून नव्हताच! एका वस्तूबद्दल दुसरी वस्तू दिली जात होती. प्राथमिक स्वरूपात हत्तीचे दात, प्राण्यांचे केस, झाडांच्या साली, बिया, शंख, शिंपले इत्यादी आदी गोष्टी पैसा म्हणून वापरले जात होते. बक्सरच्या लढाईनंतर सन १७६४-६५मध्ये ब्रिटिश ईस्टइंडिया कंपनीने भारतात मोगल बादशाह शाहआलमची नाणी पाडून देण्यास सुरुवात केली. त्यावेळची नाणी हाताने तयार करण्यात येत असत.**

विशेष
**कृष्णकुमार निकोडे**

भारतीय रूपयासाठी प्रतिकचिन्ह असा तयार करण्यात आला आहे. डी.उदयकुमार या आयआय.टी.च्या विद्यार्थ्याने केलेल्या रेखांकनाची यासाठी निवड करण्यात आली. या प्रतिकचिन्हाच्या वापराने भारतीय रुपयाला जागतीक अर्थव्यवस्थेत नवा आयाम मिळाला आहे. दि.८ जुलै २०१० रोजी झालेल्या भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यास मंजुरी देण्यात आली व प्रतिकचिन्हासह चलन चलनात आणले गेले. काही ठिकाणी हीच तारीख १५ जुलै अशीही वाचायला मिळते. हे प्रतिकचिन्ह आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारासाठी उपयोगात आणले. रुपया अशा रीतीने चिन्हांकित केल्यानंतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये यास स्थान दिले गेले.रूपया हे भारतीय गणराज्याचे अधिकृत चलन आहे. एक रुपया हा शंभर पैशांमध्ये विभागला जातो. भारतीय चलनामध्ये नोटा व नाणी वापरली जातात. त्या सर्व चलनी नोटा या भारतीय रिझर्व बँकेतर्फे बनविल्या जातात. या चलनासाठी युनिकोड नियमावली ठरवण्यात आली आहे. रुपया हा शब्द संस्कृतमधील रूप्य किंवा रौप्य या शब्दापासून आला आहे. रौप्य हा चांदी-रजत या धातूपासून बनलेला एक मिश्र धातू आहे. रुप्यापासून बनविलेला तो रुपया-पूर्वीचे राजे चलनासाठी चांदीचे नाणे बनवीत असत. आज घटकेला व्यवहारात रुपयाशिवाय पानी हलत नाही. हातात रुपये नाही तर सर्व व्यवहार खोळंबतात. पूर्वापार चालत आलेली म्हण आजही लागू पडत आहे- हातात नाही दमडी, हाटाला गेली शेंबडी!

इतिहास : पूर्वी वस्तुविनिमय पद्धत होती, पैसा म्हणून नव्हताच! एका वस्तूबद्दल दुसरी वस्तू दिली जात होती. प्राथमिक स्वरूपात हत्तीचे दात, प्राण्यांचे केस, झाडांच्या साली, बिया, शंख, शिंपले इत्यादी आदी गोष्टी पैसा म्हणून वापरले जात होते. बक्सरच्या लढाईनंतर सन १७६४-६५मध्ये ब्रिटिश ईस्टइंडिया कंपनीने भारतात मोगल बादशाह शाहआलमची नाणी पाडून देण्यास सुरुवात केली. त्यावेळची नाणी हाताने तयार करण्यात येत असत. त्यामुळे ती गोल, साचेबद्ध, एकसारखी नसत. पुढे सन १७९०मध्ये भारत देशात यासाठी मशीन मागविण्यात आली. त्याद्वारे तयार करण्यात आलेली नाणी बरीच सुबक झाली. भारतात गोल, सुबक, सारख्या वजनाची, प्रमाणित नाणी तयार करण्याचा मान जेम्स प्रिन्सेप यांना जातो. त्यांना भारतीय नाणी शास्त्राचे जनक मानले जाते. त्यांनी भारतीय नाण्यांचा सखोल अभ्यास करून भारतीय नाणी साचेबद्ध आणि सारख्या वजनाची असावीत, म्हणून एक अहवाल तयार करून लॉर्ड विल्यम बेंटिक यांच्याकडे पाठविला. तो अहवाल मंजूर झाला व त्यांनी पाठविलेल्या सहा नमुन्यांपैकी एक मंजूर करण्यात आला. त्या पहिल्या नाण्यावर तत्कालीन ब्रिटिश राजे चौथे विल्यम यांची भावमुद्रा होती. तेव्हापासून भारतीय नाणी यंत्रांद्वारे तयार करण्यात येऊ लागली. प्रिन्सेप यांनीच भारतात वजन आणि मापे प्रमाणित असावीत, म्हणून सरकार दरबारी पाठपुरावा केला. तोही अहवाल मंजूर होऊन भारतात वजन आणि मापे प्रमाणित झाली. या सोबतच कोणते नाणे कुठे तयार करण्यात आले? नकली किं असली? उसणवार परत घेणे व चोख व्यवहार आदी समजण्यासाठी सर्व प्रकारच्या नाण्यांवर एक छोटी खूण करण्यात येऊ लागली. ती पाहून नाणी जमा करणे हा या छंदातला एक महत्त्वाचा भाग समजला जातो. आजच्या चित्रपट गीतांमध्येही रुपयांचा उल्लेख असा केला जातो- दे दे मेरा दे दे बिस रुपया! ट्वेंटी रुपीज माय ट्वेंटी रुपीज!!

सन १८३३-३४पासून विल्यम राजाच्या छापाची नाणी तयार व्हावयास सुरुवात झाली. त्यानंतर अनुक्रमे व्हिक्टोरिया राणी, आठवे एडवर्ड, पंचम जॉर्ज आणि सहावे जॉर्ज सहावे या राजांची मुद्रा असलेली नाणी सन १९४७ पर्यत भारतात तयार करण्यात आली. या कामासाठी तत्कालीन भारताच्या तिन्ही म्हणजे बंगाल, मुंबई आणि मद्रास या प्रांतात अनेक नवीन टांकसाळी तयार करण्यात आल्या. तांबे, चांदी व सोने वापरून नवीन नाणी तयार करण्यात आली. त्यासाठी नवा कायदाही अस्तित्वात आला. सगळ्यात लहान नाणे म्हणजे १पै, ३पैमिळून १पैसा, ६पैशांचा १आणा, १६आण्यांचा १रुपया, १५रुपये म्हणजे १मोहर- सोन्याचे नाणे असे प्रमाण ठरविले गेले. त्यावर एका बाजूला राजा वा राणीच्या भावमुद्रा तर दुसऱ्या बाजूस ईस्टइंडिया कंपनी किंवा नाण्याची किंमत वगैरे माहिती लिहिली जात असे. भारताला स्वातंत्र्य मिळण्याचे निश्चित झाल्यावर नाण्यांमध्ये थोडा बदल करण्यात आला. एकीकडे सहावे जॉर्ज यांची भावमुद्रा तशीच ठेवण्यात आली तर दुसऱ्या बाजूस भारताचे प्रतीक म्हणून सिंहाचे चित्र आले. इ.स.१९५० साली मात्र पूर्णपणे भारतीय नाणी तयार करण्यात आली. ही नवी नाणी चांदीची नव्हती पण त्यांचे रुपया हे नाव मात्र स्वीकारण्यात आले. ब्रिटिश राजे-राण्यांचे चित्र काढून टाकण्यात आले. आता त्याऐवजी चारही दिशांकडे पाहणारे चार सिंहाचे मानचित्र आले. सन १९५७ नंतर आणखी बदल करून एक रुपयाचे १००पैसे असे प्रमाण ठरविण्यात आले. तेव्हापासून आजवर नाण्यांच्या धातू, वजन वगैरेमध्ये वेळोवेळी बदल होत गेले. मुख्य म्हणजे दर्शनी भागावर काहीही फरक झालेले नाहीत.

रूपयाची उत्क्रांती : फुटी कौडी पासून कवडी आली. कवडीपासून दमडी आली. दमडीपासून धेला आला. धेलापासून पै आली. पैपासून पैसा आला. पैसापासून आणा आला व आणापासून रुपया आला. जुनी भारतीय चलन प्रणाली कशी मोजली जात होती? ते खालील विभागणी वरून लक्षात येईल : २५६दमडी - १९२पै - १२८धेला - ६४पै - १६आणे - १रुपया. ही पद्धती पन्नासच्या दशकानंतर बाद करून पैसे पद्धत सुधारण्यात आली व १०० पैशांचा १रुपया अशी मोजदाद होऊ लागली. त्याकाळच्या एका घटनेवरून ही म्हण प्रचलित झाली- सफेद कपडे खिसे खाली! दोन पैशासाठी खून झाली!!

नोटा व नाणी : सन २००५पासून बनविल्या जाणाऱ्या नोटा- सध्या ५रुपये ते २०००रुपयेपर्यतच्या नोटा चलनात आहेत. पूर्वी चलनात असलेल्या एक व दोन रुपयांच्या नोटा अजूनही ग्राह्य आहेत. परंतु या किंमतींच्या नवीन नोटा छापल्या जात नाहीत. भारतीय चलनातील शंभर रुपयांच्या नोटेच्या पृष्ठभागावरील हिमशिखर म्हणजे माउंट कांचनगंगा' होय. नोव्हेंबर २०१६मध्ये मा.मोदी सरकारने चलनातील पाचशे व हजार रुपयांच्या नोटा रातोरात रद्द झाल्याचे जाहीर केले. त्याऐवजी ५०० व २००० च्या नव्या नोटा चलनात आणल्या. ७५चे नाणे- दि.३० डिसेंबर २०१८ला विमोचित झाले, मात्र नेहमीच्या वापरासाठी ते नाही. पुढील नाणी १०, ५, २ व १ हे चालू आहेत. मात्र ५०पैसे- ३० जून २०११पासून भारतीय चलनातील सर्वात कमी किमतीचे चलन आहे आणि २५पैसे- ३० जून २०११पासून ५०पैशांखालील किंमतीची सर्व नाणी चलनातून अधिकृतरीत्या बाद झाली आहेत. अल्पशी माहिती लेख प्रपंचरूपाने सेवेशी सविनय सादर!

(लेखक गडचिरोलीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत.)



# भारताचे 'वॉरेन बफेट' राकेश झुनझुनवाला

गुंतवणूक क्षेत्रातील मोठे प्रस्थ आणि दलाल स्ट्रीटचे राकेश झुनझुनवाला यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त वर्तमानच्या वाचकांसाठी हा विशेष लेख देत आहोत.

निमित्त
**विशेष प्रतिनिधी**

राकेश झुनझुनवाला यांचा जन्म एका आयकर अधिकाऱ्याच्या सर्वसामान्य मध्यमवर्गीय घरामध्ये झाला. १९८५ साली राकेश झुनझुनवालायांनी कॉलेजमध्ये असल्यापासूनच शेअर ट्रेडींगला सुरुवात केली. त्यावेळेस बीएससीचा सेन्सेक्स केवळ १५० अंकांवर होता. पहिल्यांदा त्यांनी पाच हजारांची गुंतवणूक करत ट्रेडिंगला सुरुवात केली. सध्या फोर्ब्सच्या आकडेवारीनुसार ३ जुलै २०२१ च्या माहितीनुसार झुनझुनवाला यांची संपत्ती ४.६ बिलियन डॉलर्स म्हणजेच ३४ हजार ३८७ कोटी रूपये इतकी आहे. राकेश झुनझुनवाला यांनी सर्वात आधी टाटा टीसंदर्भात व्यक्त केलेला अंदाज बरोबर ठरला आणि १९८६ साली त्यांना पाच लाखांचा नफा झालेला. त्यांनी ४३ रूपयांना टाटा टीचे पाच हजार शेअर्स विकत घेतले होते. त्यानंतर अवघ्या तीन महिन्यांमध्ये या शेअर्सची किंमत १४३ पर्यत वाढली त्यामुळेच त्यांनी गुंतवणूक केलेल्या रक्कमेच्या तिपटीहून अधिक पैसा त्यांना मिळाला. १९९२ च्या शेअर बाजार घोटाळ्याचा त्यांना मोठा फटका बसलेला. एका मुलाखतीमध्ये राकेश झुनझुनवाला यांनीच आपण शॉर्ट सेलिंगच्या माध्यमातून भरपूर पैसा कमवल्याचे कबूल केले होते. १९९० च्या दशकामध्ये भारतीय शेअर बाजारामध्ये कार्टेलच्या माध्यमातून सौदे केले जात.

याचबरोबर राधाकृष्ण दमानी (डी मार्टचे सर्वेसर्वा) आणि राकेश झुनझुनवाला यांच्या नावाचीही त्या काळात चर्चा होती. १९९२ साली पत्रकार सुचेता दलाल यांनी शेअर बाजारातील घोटाळा उघडीस आणला आणि शेअर बाजार कोसळला होता. १९८७ मध्ये राकेश राधेशाम झुनझुनवाला यांनी रेखा झुनझुनवाला यांच्याशी लग्न केले. अंधेरीत राहणाऱ्या रेखा हा स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदार होत्या. २००३ साली झुनझुनवाला यांनी त्यांची स्वत:ची स्टॉक ट्रेडींग फर्म रेअर एन्टरप्रायझेसची स्थापना केली. हे नाव त्यांनी पत्नीच्या आणि स्वत:च्या नावाच्या सुरूवातीच्या अक्षरांपासून ठेवले आहे. मार्च ३१, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीमध्ये राकेश झुनझुनवाला आणि त्यांच्या सहकाऱ्यांची गुंतवणूक ही ३७ कंपन्यांमध्ये आहे. ट्रेण्डलेनीच्या आकडेवारीनुसार झुनझुनवाला यांची या मोठ्या कंपन्यांमधी एकूण गुंतवणुकीचे मूल्य १९ हजार ६९५ कोटी ३० लाख रूपये इतके आहे. घड्याळे आणि दागिने बनवणाऱ्या टायटन कंपनीमध्ये राकेश झुनझुनवाला यांचा सर्वाधिक म्हणजेच ७ हजार ८७९ कोटी रूपयांचा वाटा असून त्या खालोखाल टाटा मोटर्समध्ये १ हजार ४७४ कोटी ४० लाख आणि क्रिसिलमध्ये १ हजार ६३ कोटी २० लाखांचा वाटा आहे.

## ऋतुजा जाब्रसचे दहावी परिक्षेत यश

▶ प्रतिनिधी



माजलगाव : येथील पत्रकार कमलेश जाब्रस यांची मुलगी कु.ऋतुजा कमलेश जाब्रस हिने दहावी परिक्षेत ९८.४० टक्के गुण घेत घवघवीत यश मिळविले आहे. कु.ऋतुजा जाब्रस ही येथील सिध्देश्वर विद्यालयाची विद्यार्थीनी आहे. शाळेत अभ्यास, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमात तिचा नेहमीच सहभाग असतो. शालांत परिक्षेचा १६ जुलैला निकाल जाहिर झाला. यामध्ये कु.ऋतुजाने ९८.४० टक्के गुण मिळवित घवघवीत यश प्राप्त केले आहे.

















## जनसामान्यांचे हृदयस्थान

# अजितदादा पवार

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार हे आपल्या तडफदार कार्यशैलीमुळे उभ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. अजित पवारांना त्यांचे समर्थक आणि पक्षातील नेतेही 'दादा' या नावाने आदराने संबोधतात. शब्द दिला की अजितदादा पाळतात, असे अनेक अनुभव कार्यकर्ते, नेते सांगत असतात. २२ जुलै हा अजितदादा यांचा वाढदिवस त्या अनुषंगाने राजकारणातील दादा व्यक्तीमत्वाबद्दल हा विशेष लेख.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांचा आज वाढदिवस. छत्रपती साखर कारखान्याचे संचालक ते राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी राजकीय झेप घेतली. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांची कारकीर्द बहरली. त्यांनी एकदा बारामती लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले. त्यानंतर मात्र ते राज्याच्या राजकारणात रमले. राज्यात १९९० नंतर नेत्यांची नवीन पिढी उदयास आली. त्यात अजित पवार यांचे नाव अग्रभागी राहिले.

**निमित्त**



**अशोक डक**

परिचितांमध्ये आणि कार्यकर्त्यात त्यांची ओळख 'दादा' म्हणूनच आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची राजकीय वाटचाल सुरू झाली. राष्ट्रवादी काँग्रेस १९९९ मध्ये सत्तेत आल्यानंतर अल्पावधीत सरकार आणि संघटना या दोन्ही ठिकाणी अजितदादांनी आपला प्रभाव वाढवला. अजितदादांनी २०१४ पर्यंत राज्यात विविध खाती सांभाळली. प्रशासनावर वचक असलेला नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. पक्ष कार्यकर्त्यांना त्यांची कारभाराची कार्यक्षम शैली आकर्षित करते. राज्यातून २०१४ नंतर पक्षाची सत्ता गेल्यानंतर अजितदादा स्वस्थ बसलेले नाहीत. 'राजकीय जीवनात चढउतार होत असतात. सत्तेचा कोणीही ताम्रपट घेऊन आलेला नसतो. त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी स्वस्थ बसायचे नाही,' असा त्यांचा कार्यकर्त्यांना सांगावा असतो. विरोधी पक्ष म्हणून राष्ट्रवादीने आपला दरारा त्यामुळे ठेवला आहे. सहा वेळा बारामतीचे आमदार म्हणून विक्रमी मतांनी विजयी होणाऱ्या अजितदादा पवार यांनी बारामतीचा चेहरामोहरा बदलला आहे. जनसामान्यांच्या मनात ह्यदयस्थान असलेल्या दादा माणसाला वाढदिवसानिमित्त दीर्घायुष्य चिंतितो.


















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.